# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे

( दि.१ ऑगस्ट, १९२० - १८ जुलै, १९६९)

(अल्प परिचय)

कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव (ता. वाळवा जि. सांगली) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिधोजी तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम. अण्णाभाऊंचे शालेय शिक्षण झालेले नव्हते तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले.

सन १९३२ साली ते वडिलांसोबत मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईतील कामगारांचे कष्टमय, दुःखी जीवन त्यांनी पाहिले. त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. अण्णाभाऊंनी सन १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने “लाल बावटा” कलापथक स्थापन केले. या कलापथकावर इंग्रज सरकारने बंदी घातली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या लेखनात लावणी, पोवाडे, गीते, लोकनाटये आदींचा समावेश होता. अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आबी, खुळवाडी, बरबाद्याकंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह. त्यांनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा (१९४५) ही त्यांची पहिली कादंबरी. नंतर फकिरा (१९५९), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता यांसारख्या प्रसिध्द कादंबऱ्या त्यांनी लिहील्या. त्यांच्या “फकिरा” या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले आहेत. वैजयंता (१९६१ कादंबरी वैजयंता), टिळा लावते मी रक्ताचा (१९६९, कादंबरी आवडी), डोंगरची मैना (१९६९, कादंबरी माकडीचा माळ) मुरली मल्हारीरायाची (१९६९, कादंबरी चिखलातील कमळ), वारणेचा वाघ (१९७० कादंबरी वारणेचा वाघ), अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंबरी अलगूज), फकिरा (कादंबरी फकिरा). या शिवाय इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली.

उपेक्षित, गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. “जग बदल घालुनी

घाव। सांगूनि गेले मज भीमराव॥” हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत “माझी मैना गावावर राहिली” आणि “मुंबईची लावणी” या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दलित लेखकांची एक प्रतिभावान पिढी निर्माण झाली. त्यात बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, शरणकुमार लिंबाळे आदींचा अंतर्भाव होतो.

रशियाच्या “इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटी” च्या निमंत्रणावरून ते १९६१ साली रशियाला गेले. तेथील अनुभवांवर आधारित “माझा रशियाचा प्रवास” हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले.

महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध सिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ “अण्णाभाऊ साठे अध्यासन” सुरु करण्यात आले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

*****

(स्त्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)